# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/02/2023 (शुक्रवार) सकाळ

---

### घरफोडी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मौजा हरणखूरी काटोल येथे दिनांक १४/०२/२०२३ चे २२.०० वा. ते दिनांक १५/०२/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजकुमार भूराजी गूजवार, वय ३५ वर्ष रा. पाणवाडी तह. काटोल जि. नागपुर हा आपले घरात उशीखाली नगदी २००००/– रूपये व रियलमी कंपनीचा जुना मोबाईल किंमती अंदाजे २०००/– रूपये असा एकुण २२,०००/– रूपयाचा मुद्देमाल घेवुन झोपला असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे दरवाज्याचे वरून घरात प्रवेश करून चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ९०० हिरूळकर मो. नं.९३५९३९११८६ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील इंदर कालोनी ते इंदर मॅनेजर कोल डेपो ऑफीस रोड येथे दिनांक १६/०२/२०२३ चे १२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविकांत रामदास कंडे, वय ४५ वर्ष, रा. चनकापुर कॉलनी कॉर्टर नं. २६/०१ वेकोली कामठी हे गस्त करित असता काही मुले जवळपास २० ते २२ वर्षाचे फिर्यादीला पाहुन पळाले फिर्यादीने घटनास्थळी जावुन पाहणी केली असता आरोपीची मारोती व्हॅन क्र. एम.एच–२६/एल–१४३८ चा चालक व इतर अनोळखी इसम यांनी अवैधरित्या १२५० किलो कोळसा किंमती अंदाजे ७५००/– रूपयाचा मुद्देमाल चोरी करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गुरूप्रसाद मेश्राम ब. नं. ३८१ मो. नं. ९८२३४५३१६९ हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक ११/०२/२०२३ चे १२.०५ वा. ते १५/०२/२०२३ चे ११.१६ वा. दरम्यान फिर्यादी व आरोपी नामे– दिपक वसंता चाफेकर, वय ३६ वर्ष, रा. मातातखेडी वार्ड क्र. १६ सावनेर हे एकमेकाचे शेजारी राहत असुन फिर्यादीची सुन पिडीता वय २७ वर्ष ही घरी एकटीच असतांनी व बाथरुम मध्ये आंघोळ करीत असतांनी आरोपीने बाथरुमचे खिडकीवर मोबाईल फोन ठेवून पिडीतेचा मनात लज्जा निर्माण होईल अशा पदधतीने चित्रीकरण करून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (क) भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक तिवारी मो. नं ९६८९८९१४८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**